# श्री गजानन लोकसेवा सहकारी बँक मर्यादित

## चिंचवड, पुणे - ४११ ०१९.

### गती... प्रगती...आणि समृध्दी

नोंदणी क्र. : पी एन ए/बी एन के/१२३/सन १९९९ दि. २८/०५/१९९९
रिझर्व्ह बँक परवाना क्र. : युबीडी.एमयुएम. (एमएएच)०००९ पी/१९९९-२००० दि. २५/१०/१९९९

## ⁕ वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ⁕

**(फक्त सभासदांसाठी)**

**श्री गजानन लोकसेवा सहकारी बँक मर्यादित, संभाजीनगर, चिंचवड, पुणे - १९ या बँकेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. २६/०८/२०२६ रोजी सकाळी १० .०० वाजता रोटरी क्लब हॉल, जी-ब्लॉक, थरमॅक्स चौकाजवळ, संभाजीनगर, चिंचवड, पुणे - ४११०१९** या ठिकाणी बँकेचे अध्यक्ष **श्री. योगेश मधुकर बाबर** यांचे अध्यक्षतेखाली पुढील विषयांचे कामकाज करणे करीता होणार आहे. सदर सभेस बँकेच्या सर्व सभासदांनी उपस्थित रहावे. ही विनंती.

## ⁕ सभेपुढील विषय ⁕

१) दिनांक ०७/०९/२०२५ रोजी झालेल्या २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दिनांक ३१/०३/२०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफातोटा पत्रकावर विचार करणे व स्विकृत करणे.

३) सन २०२५-२६ साठीच्या मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा विभागणीस मंजूरी देणे व मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारसीनुसार लाभांश जाहिर करणे.

४) सन २०२५-२६ अखेरच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे, तसेच सन २०२४-२५ च्या वैधानिक लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालावर विचार करणे व स्विकृत करणे.

५) सन २०२६-२७ करीता वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीबाबत रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे. तसेच सन २०२६-२७ करीता कंकरंट लेखापरिक्षकांच्या मा. संचालक मंडळाने केलेल्या नेमणूकीस मान्यता देणे.

६) सन २०२६-२७ करीता मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे तसेच मागील वर्षाचे अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.

७) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या परिपत्रकाप्रमाणे बँकेचा स्टाफिंग पॅटर्न मंजुर करणे.

८) बँकेचे मा. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.
(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५(२) नुसार)

९) महाराष्ट्र शासनाच्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे.

१०) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेतील अनुपस्थित सभासदांची रजा क्षमापित करणे.

११) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा.संचालक मंडळाच्या आज्ञेवरून
**संजय वासुदेव जोशी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**स्थळ : संभाजीनगर, चिंचवड**
**दिनांक : १२/०८/२०२६**

---

१) गणसंख्येअभावी सदर सभा तहकूब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्यास गणसंख्यापुर्तीचे बंधन राहणार नाही.

२) सभासदांना सभेपुढील विषयांसंबंधी काही प्रश्न किंवा सूचना करावयाच्या असतील तर त्या सभेच्या दिनांकापूर्वी सात दिवस अगोदर बँकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात सादर कराव्यात. ऐनवेळी उपस्थित केलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.

३) अहवालाची प्रत बँकेच्या मुख्य कार्यालयातुन घेऊन जावी. तसेच बँकेच्या https://www.gajanan.bank.in या वेबसाईटवरही अहवाल उपलब्ध आहे.

४) ज्या सभासदांचे पत्ते बदलले असतील त्यांनी **रहिवासी पुराव्याची** प्रमाणित प्रत मुख्य कार्यालयात सादर करावी. तसेच सर्व सभासदांनी त्यांचे **पॅनकार्ड, फोटो,** ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांकही बँकेस कळवावेत.

५) ज्या सभासदांनी आपले भाग दाखले व डिव्हीडंड नेले नसतील त्यांनी के.वाय.सी. पुर्तता करून व वारस नोंद केल्याची खात्री करून बँकेच्या मुख्य कार्यालयातुन घेऊन जावेत.

६) ज्या सभासदांच्या मुलाला/ मुलीला इयत्ता १० वीच्या परीक्षेत ८०% पेक्षा अधिक व १२ वी च्या परीक्षेत ७० % पेक्षा अधिक गुण मिळाले असतील त्यांनी गुणपत्रिकेची प्रमाणित प्रत ७ दिवस अगोदर बँकेत आणून द्यावी. अशा पाल्यांचा बँकेतर्फे सर्वसाधारण वार्षिक सभेत यथोचित गुणगौरव करण्यात येईल.